

# पिनुकाका आणि पारूकाकी

सादर करत आहेत

पाच जोडप्यांसाठी पंचरंगी केळवण

सोमवार ता. २६ नोव्हेंबररोजी

सायंकाळी ठीक सात वाजतां,

स्वप्नशिल्प हॉल, स्वाती हॉटेल,

१२३४ आपटे रोड, डेक्कन जिमखाना

पुणे, ४११००४. सर्व जागा राखीव.

लेखन, दिग्दर्शन, काव्यरचना,

स्वररचना, आणि कल्पना

अशोक बसर्गेकर उर्फ पिनाकपाणि

कलाकार : पार्वती, पिनाकपाणि

# पंचरंगी केळवण

( २६ नोव्हेंबर २००७ रोजी हा दोन पात्री कार्यक्रम मी आणि माझी सौभाग्यवती प्रीती बसर्गेकर असे दोघानी पुण्यामध्ये पांच विवाहिच्छुक जोडप्यांसाठी सादर केला होता. )

---

आजच्या कार्यक्रमाचा मुख्य विषय आहे प्रेम. आणि त्याचा सादरकर्ता, लेखक, कवि, दिग्दर्शक, गायक, संगीत दिग्दर्शक मीच आहे. प्रमुख कलाकार, गायक आणि गायिका मी आणि प्रीती आहोत. दोघेहि याबाबतीत धंदेवाईक नसल्याने कासेची लंगोटी डोईवर बांधून लाज सोडून भसाड्या आवाजात जसे जमेल तसे आम्ही हा कार्यक्रम सादर करणार आहोत. मी म्हणजे कांही पु. ल. देशपांडे नाही आणि प्रीती म्हणजे कोणी भक्ती बर्वे नाही. तसेच मी कांही सुधीर फडके नाही. अगर प्रीती कांही आशा भोसले नाही . जर कोणाला आम्ही हा प्रकार ताबडतोब थांबवावा असे वाटले तर "हवे तर तुम्हाला माणशी हजार रुपये देतो. पण कृपाकरून आतां हे थांबवा." असे सांगावे. आम्ही आनंदाने ते सर्व गोळा करून आमचे चंबूगबाळे आवरायला तयार आहोत. अजिबात संकोच नको.
आणखी एक आवर्जून सांगतो. येथे आम्हाला कोणाबाबत टीका करायची नाही. हा सर्व विनोद आहे.

तर मी काय सांगत होतो. . . .

दीड वर्षापूर्वी मी व प्रीती येथे डॉ. पुष्करला केळवण म्हणजे **Bachelors Party at the banana plantation** द्यावी व त्याच्या लग्नाला हजर रहावे ह्या हेतूने आलो होतो. पार्टी दिली पण माझ्या मनात जो हेतु होता त्या ऐवजी ती पार्टी भलतीच वहात गेली. तेथे पुष्करला उत्सव मूर्ती करावे, त्याचे अभिनंदन करावे, त्याचे वैवाहिक जीवन सुखासमृद्धीचे जावे असे आशीर्वाद द्यावेत आणि त्याचबरोबर त्याच्या भावी जीवनाबाबत काही गमतीच्या स्वरूपात सूचना कराव्यात असा माझा हेतु होता. पण झाले काय तर ते एक हिंदुधर्माचे व्यासपीठ झाले.
सुरवातीला माझे थोरले बन्धु म्हणाले, " अरे, खरंच आहे ते. लग्न म्हणजे मोठी जबाबदारी असते. नुसते नाव काढले तर अंगाचा थरकाप होतो."
हे ऐकल्यावर माझ्या डोळ्यासमोर एक निराळेच चित्र साकार झाले आणि कवितेच्या स्वरूपात दिसू लागले.

नितंब पसरट, सपाट छाती तिरळा डोळा, दांत पुढे ।
अंतरपाटाआड जानकी, बोहल्यावरती राम चढे ॥
सावधान हे शब्द ऐकतां, पायीं लटपट घाम फुटे ।
ढेंगा टाकत पळतां पळतां, ब्रह्मचर्य तें त्यास पटे ॥

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते असल्याने माझे बंधु पुढे म्हणाले, " सरकारी नोकरीत असताना तसेच त्यानंतर मी जसा सदोदित राष्ट्राच्या सेवेसाठी रात्रंदिन कार्य करीत होतो तसे मुलानो, मित्रानो, बंधूनो, भगिनीनो तसेच माझी बायको या सर्वांनी आपल्या देशासाठी काहीतरी केले पाहिजे".
हे ऐकून मला वाटू लागले. अरे बापरे. आपल्या देशावर कोणते तरी महा संकट येऊन उभे राहिले आहे. आणि सत्तरी ओलांडून गेलेल्या माझ्या तीन्ही वहिन्यांना आता कंबर कसून हातामध्ये शाखेच्या लाठ्या उगारून देशाच्या सेवेसाठी सिद्ध झाले पाहिजे.

माझे दुसरे थोरले बंधु जेव्हा बोलायला उभे राहिले तेंव्हा त्यानी तर त्यावेळी समाजकल्याणाचे राजकीय स्वरूप असलेले एक व्यासपीठ करून टाकले.
मोठ्या आवेशात त्यानी समाजकल्याणासाठी कसे लाखो रुपये गोळा केले व देश सेवा केली याचे वर्णन करून सांगितले. माझ्या डोळ्यासमोर नवीन लग्न झालेले डॉ. पुष्कर आणि सौ. डॉ अश्विनी हातात झोळी घेऊन ओम् भवति भिक्षां देहि असे म्हणत दारोदारी समाजसेवेसाठी निधी गोळा करत हिंडत आहेत असे दिसू लागले.

एवढेच काय तर या सभेमध्ये मला भारताचे अमेरिकेला मिळालेले सांस्कृतिक वकील अशी पदवी बहाल करण्यात आली. खरे म्हणजे ह्या सर्व प्रकारामुळे मला दरदरून घाम फुटला होता. साधे इंजिनीअर होता होता नाके नऊ आले आणि वकील कसले करता राव असे म्हणण्याची माझ्यावर पाळी आली.
कार्यक्रमाच्या सुरवातीला मी एक दोन विनोद सांगण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण एक साधे चिटपांखरू देखील हंसले नाही. माझ्यात विनोदबुद्धी नाही हे स्पष्ट झाले. सर्वात कहर म्हणजे मला माहीत असलेल्या तसेच जमलेले सर्व एकमेकांना चांगले ओळखत असतानाहि आपण कोण आहे, आपले कुटुंब कसे प्रेमळ आहे अशी वर्णने करणारी जोरदार भाषणे झाली. ज्याच्यासाठी केळवण होते तो बिचारा बाजूलाच राहिला. त्याच्याबाबत कोणीहि एक शब्द देखील बोलले नाही.

तेव्हा सौरभ, रश्मी, अपर्णा, पूजा, मुक्ता, सत्यवती, योगेश, मंदार, संजोग, दीपक ह्या सर्व उत्सवमूर्तींना आवर्जून सांगतो की काही घाबरू नका.

अशी कोणतीहि परिस्थिती येथे आलेली नाही. तसेच भारतावर कोणतेहि संकट येऊन उभे राहिलेले नाही. काळजी करू नका. पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नरेंद्र जाधव देखील अमेरिकेत येऊन सांगून गेले. भारताचे भवितव्य उज्वल आहे. भारत थोड्याच अवधीत अमेरिकेपेक्षा प्रगतीत वरचढ होणार आहे. उदाहरण द्यायचेच तर सांगतो. अमेरिकेला मदत करायला म्हणून अमेरिकेत पार्थ, प्रिया, ऋचा ही आपलीच तरुण मंडळी तिकडे जाऊन आलेली आहेत. **His Highness** शशांकराजे ( माझे थोरले बंधु आपल्या नातवाला **His Highness** असे म्हणतात.) पण म्हणतात की अमेरिकेला रुपये खरेदी करायला यापुढे चाळीस डॉलर्स मोजावे लागणार आहेत. तेव्हा या वृद्ध समाजसेवा करणाऱ्या स्वातंत्र्यवीरांचे कितपत ऐकायचे ते तुम्हीच ठरवा.

पुष्करच्या केळवणाप्रसंगी मी विनोद करण्याचा प्रयत्न केला. पण जमला नाही. आमचे **His Highness** शशांकराजे ह्यानी मला **Email** पाठवून अभिप्राय कळवला होता. कार्यक्रमाच्या वेळी ते चक्क जांभया व डुलक्या देत बसले होते.
आतां त्यांना जागे ठेवण्यासाठी परत एकदा एक विनोद सांगून ते जागे राहतात का ते पाहतो.

लहानपणी मला अगदी हौशीने माझे बंधु बापू हे संस्कृत शिकवायचा प्रयत्न करीत होते. त्यावेळची एक गोष्ट मला आठवते.
नुकताच त्यानी मला एक संस्कृत श्लोक म्हणायला शिकवला होता. तो असा आहे.

याकुन्देन्दु तुषारहार धवला या शुभ्रवस्त्रावृता।
या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना॥
या ब्रह्माच्युतशङ्करप्रभृतिभिः देवेः सदा वन्दिता।
सा माम्पातु सरस्वती भगवती निःशेष जाड्या पहा॥

त्यांनी मला विचारले, " सांग अर्थ"
माझ्यासारख्या मठ्ठ डोक्याच्या माणसाला ते समजणे महा कठीण होते. मी घाबरलो. घाबरून डोळ्यात पाणी काढून बधितले. काही उपयोग झाला नाही. पण शेवटी धाडस करून हे काय असावे याचा थोडावेळ विचार करून म्हणालो.
भीमराव, अच्युतराव, शंकरराव ह्या सगळ्या बसर्गेकर कुळातील देवांची सेवा करणाऱ्या सामाप्पा, माझे जरा ऐक, शहापुरी कुन्दा खाणे, गरम गरम सार ढवळून पिणे, पांढरी चादर डोक्यावर घेऊन झोपणे असले प्रकार न करता पद्मासन घालून व्यायाम करून दंडातली बेडकुळी टप्पोरी करण्यात वेळ घालव. कारण सरस्वतीकाकू बसर्गेकर कशा निःसंशय जाड्याजुड्या आहेत ते बघ. बापू बिचारे काय करणार! कपाळावर हात मारून घेतला झालं।

माझ्या विनोदाच्या अपयशाचे आणी एक उदाहरण देतो. मध्यंतरी मी एक माझ्या मते विनोदी असलेले एक व्यंगचित्र इकडे पाठवून दिले होते. प्रसंग असा आहे. अमेरिकेतील एक प्रसिद्ध नट रिचर्ड गीयर भारतात आले होते. ते व येथली शिल्पा शेट्टी हे **AIDS** चे निवारण करण्याच्या मोहिमेवर होते. एका सार्वजनिक सभेमध्ये ह्या साठी ओलांडून गेलेल्या नटाने आपली नात शोभून दिसेल अश्या शिल्पा शेट्टीच्या गालाचा मुका घेतला. अरे! आमच्या भारतीय स्त्रीचा हा विनयभंग करतो? लागलीच त्याच्या फोटोची जाळपोळ वगैरे प्रकार झाले. एवढेच काय तर त्याला पकडून न्यायालयात उभे करण्याच्या मागण्या झाल्या. ह्यावर आधारलेले ते एक व्यंगचित्र होते. चित्रात न्यायमूर्ती रिचर्ड गियरवर आपली हातोडी फेकून मारतात व ह्या अपराधावर तुला फाशीचीच शिक्षा योग्य आहे असे म्हणतात असा प्रसंग चित्रात होता. चित्राखाली मी लिहिलं होतं, " मिस्टर गियर, आमच्या अध्यात्मिक देशात आम्हाला चुंबन बिंबन काही माहीत नाही. तेव्हा यासाठी तुम्हाला फाशीचीच शिक्षा योग्य आहे. " खरे म्हणजे मला पुढे असेहि लिहायचे होते. " खरं वाटत नसेल तर हवं तर आमच्या बायकोला विचारून पहा. तुला काय कळंतय, गप्प बस म्हणून हवं तर तिच्यावर खेकसतो." फार ताणवायला नको. आणि " आमच्या देशाची टिंगल करतोस? " असे म्हणतील म्हणून भडकावयाला नको म्हणून मी तेथेच थांबलो होतो.

ह्या चुंबनावरून मला आणखी एक प्रसंग आठवतो. रश्मीचे बाबा, सुधीर बसर्गेकर, आमच्या घरी अमेरिकेत आले होते. त्यानी आमच्या मेधाच्या लग्नाची **Video** बघितली होती. पाहून त्याला गम्मत वाटली. शेवटी मात्र तो म्हणाला, " भारतात आमच्याकडे कोणी पाहिली तर ते आपल्या गालावर थोबाडीत मारत शांतं पापं म्हणतील."
अमेरिकेतील भारतीय रहिवासी तसेच इतर जगातील तेथे येऊन राहिलेले लोक जेव्हा लग्नानंतरच्या भोजनाच्या कार्यक्रमाला बसतात त्याबाबत थोडेसे सांगतो. ते एथल्यासारखे ज्याला अमेरिकेत **Cattle feed** असे म्हणतात अश्या पंक्ती करून एका रांकेत जनावरांपुढे गवत टाकतात असे बसत नाहीत. प्रत्येक आमंत्रित त्याला ठरवून दिलेल्या **Round Table,** गोलाकार टेबलाच्या खुर्चीवर बसतात. **Disc Jokey**

ने जाहीर करेल तसे एक एक टेबलावरील लोक स्वतःच उठून **Buffet Dinner** चे ताट घेऊन आपल्याला हवे तेवढे पदार्थ घेऊन आपल्या टेबलाकडे परतात. अर्थात तसे येथे शक्य नाही. एकतर अमेरिकेत लग्नाला आमंत्रित लोकांची संख्या जास्तीत ज्यास्त दोन ते तीनशेच्या दरम्यान असते आणी तेथले **Dining Halls** त्यामानाने मोठे असतात. येथे लग्नाला जवळ जवळ सारा गांव गोळा होतो. त्यामुळे अमेरिकेसारखा प्रकार करणे बरोबर नाही. असो.

त्या हॉलच्या साधारणपणे मध्यवर्ती जागेवर, जी जागा सर्व आमंत्रित लोकांना दिसेल अश्या ठिकाणी नवरा मुलगा, नवरी मुलगी, मुलाचे आई वडिल, मुलीचे आईवडिल, भाऊ बहिणी असे मुद्दाम निवडलेल्या टेबलावर बसतात. नवऱ्यामुलाचे अगर नवऱ्यामुलीचे आमंत्रित मित्र मैत्रिणी जेव्हा आपल्या टेबलावरील प्यायच्या पाण्याचे पेले आपल्या चमच्यानी किणकिण वाजवू लागतात तेव्हा समजावे, त्यांना नवऱ्या मुलाने व नवऱ्या मुलीने प्रेमाने भरवावे व एकमेकाना प्रेमाने जाहीरपणे चुंबन द्यावे, असे पहायचे असते. अरे! एवढेच काय तर लग्नाचा सोहळा पूर्ण झाल्यावर तेथले भटजी देखील सांगतात. " लग्नाचा सोहळा आता संपला. तुम्ही आतां नवरा व बायको आहात असे मी जाहीर करतो व आता तुम्ही चुंबन घ्यायला माझी हरकत नाही. " अर्थातच नवरा व नवरी आनंदाने भटजीची आज्ञा पाळतात.

प्रीती म्हणते. आचरट मेली. लाज लज्जा हे ह्याना काही नाही.

हा प्रकार येथल्या कर्मठ वृद्ध मंडळींना आवडायचाहि नाही व येथले तरुण तेवढे थिल्लरहि नसावेत असे मला वाटते. तरीपण सांगतो. मी जेव्हा सर परशुरामभाऊ कॉलेजमध्ये शिकायला होतो त्यावेळी आमच्या इंटर सायन्सच्या शेवटच्या निरोप समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून आलेल्या गोपीनाथ तळवळकरांचे शब्द मला आठवतात. त्यावेळी ते म्हणाले, " मुलानो आणि मुलींनो कॉलेजजीवन हे रमणीय आहे. येथे प्रेम करायला शिका." सांगायचा हेतु काय तर हे लोक कोठल्या परस्त्रीचे अगर परपुरुषाचे चुंबन घ्या असे सांगत नाहीत. एकमेकांवर खूप खूप प्रेम करा, एकमेकांसाठी खूप कष्ट करा, जीवनाचा आनंदाने अनुभव घ्या आणी सुखाने रहा असेच सांगताहेत ना?

येथल्या कर्मठ वृद्धाना माझे मत आवडत नसेल तर त्या सर्वांनी **Fidler On The Roof** हा एक उत्कृष्ट सिनेमा आहे. तो अवश्य पहावा अशी माझी त्याना विनंती आहे.

चित्रपटातील नायक अगदी जुन्या वळणाचा, आपले परंपरागत चालून आलेल्या, **Good Book** मध्ये सांगितलेल्या चालीरीतींवर विश्वास ठेवणारा असतो. त्याच्या पाच मुलींपैकी तीन मुली आपल्या आई वडलांना झिडकारून आपले आपले जोडीदार निवडतात व जातात. त्यावेळी तो म्हणतो. माझ्या मुली प्रेम करतात म्हणे. खरंच. प्रेम हा काय प्रकार आहे. माझ्या बायकोचे माझ्यावर प्रेम आहे काय? तो आपल्या बायकोकडे येतो. तिला विचारतो.

गोल्डा, माझ्या वरती तुझं प्रेम हाय काय ?
प्वाट बिघडलयं काय ?
डोस्क फिरलयं हाय ?
काय बरळतोस
तुला ठावं हाय काय ?
गोल्डा, माझ्या वरती तुझं प्रेम हाय काय ?
जग बुडतय
गाव मोडतय
सासरला तुझं प्वार जातय
ह्याचं वेळेला तुला झालंय काय ?
गोल्डा, माझ्या वरती तुझं प्रेम हाय काय ?
किती वर्स संपली
तुझी भाकर भाजली
तुझी भांडी घासली
तुझी कापडं धुतली
जल्माला तुझी पोरं घातली
प्रेमा बिगर हे झालंय काय ?
हां, गोल्डा, म्हणजे,
तुझं माझ्या वरती प्रेम खरंच हाय
व्हय रं व्हय
माझं तुझावरती प्रेम हाय रं हाय
मी लहान होतो
समज नव्हती
हाणा माऱ्या करीत होतो
मी लाजत होते
बुजत होते
असला कसला दाल्ला ?
म्हणत होते
सहवासाने प्रेमी होतिल
आई बाबा म्हणत होते

सत्य समजले
प्रेम उमगले
आनंदाला उधाण आले
तुझं माझ्यावरती
प्रेम खरंच हाय

जगासमोर नाही तरी आपल्या बायकोला आणि आपल्या नवऱ्याला उघडपणे प्रेम असल्याचे सांगायला काय हरकत आहे? .

कांही प्रेम हे खरोखरीच उदात्त आणि भव्य असते. डॉ. आनंद परांडेकरांनी आपल्या बायकोवर केलेले प्रेम तसे आहे. संकटकाली त्यांनी तिची अतोनात सेवा केली. दीपक परांडेकर ह्यानी कर्मयोगी होऊन कर्मफळाची अपेक्षा न ठेवता अर्चनाला मोठे केले. तिचे लग्न लावून दिले. अपर्णाला इंजिनियर केले व आता तिचेहि लौकरच लग्न होईल. अगदी स्वतःच्या मुली असेच समजून त्यानी या दोघाना प्रेम दिले. प्रिया आणी पूजा ह्या दोघीनाहि हाच अनुभव आला.

आजच्या जमलेल्या उत्सवमूर्तींना विवाहात भटजी संस्कृतमध्ये काय शपथा घ्यायला सांगतात हे सांगण्यासाठी तसेच एकेचाळीस वर्षानंतरहि माझे व प्रीतीचे उत्कठ प्रेम आहे ह्याचा एकमेकांना विश्वास देण्यासाठी आम्ही दोघे १९६६साली आम्हाला न समजलेल्या पण महत्वपूर्ण असलेल्या शपथांची उजळणी सादर करणार आहे. ह्यात अंगाचा थरकाप होण्यासारखे काही नाही. तेव्हा कोणत्याहि उत्सवमूर्तींनी घाबरून जाऊ नये. येथे फक्त प्रेमाची ग्वाही आहे.

ह्याला इंग्रजीत **Renewing the wedding vows** असे म्हणतात. ईंग्रजीत आणखी एक म्हण आहे. **The secrete of successful marriage is in the spouces falling in love again and again.** पुनःपुनः नवरा बायकोनी एकमेकाच्या प्रेमात पडले पाहिजे तरच तो यशस्वी संसार होतो. भारतात सुद्धा लग्नाचा २५ वा, ५० वा अगर ७५ वा वाढदिवस साजरा करताना पती पत्नी एकमेकाना आपल्या लग्नाच्या वेळच्या शपथा कायमच्या आहेत हेच सांगतात.

आज आम्ही येथे कोणाचे लग्न लावत नाही. फक्त मी आणि प्रीती एकमेकाना पूर्वी घेतलेल्या शपथांची जाणीव करून देणार आहोत. त्याच बरोबर आजच्या उत्सवमूर्तींना आपण काय करणार आहोत हे समजावे हा पण एक हेतु येथे आहे. रामदास स्वामी सारखे सावधान म्हटल्यावर पळून जाण्याची गरज नाही.

लग्नाच्या कार्यक्रमाला सुरुवात होते पुण्याहवाचनाने. यावेळी मुलीचे आईवडील, मुलाचे आईवडील, आणि मुलगा उपस्थित असतात. ते सर्व उपस्थित मंडळीना सांगतात —- अमक्याचा पणतु, अमक्याचा नातु, ह्यांचा मुलगा, अमक्यांची पणती, अमक्यांची नात व ह्यांची मुलगी एकमेकाशी विवाहबद्ध होऊ इच्छितात. तेव्हा उपस्थितानी एका आवाजात ह्या कार्याला सर्वानी संमति द्यावी आणी शुभाशीर्वाद द्यावेत. यावेळी सर्व उपस्थित एका आवाजात — शुभास्तु —- म्हणतात.

आज मी असे जाहीर करतो. मे आठ १९६६ साली मी अशोक उर्फ पिनाकपाणी म्हणजे शंकर, गोविंदरावांचा नातू, केशवराव व लक्ष्मीबाईचा कनिष्ठ पुत्र, वासंती, म्हणजे राजारामांची नात, बाळकृष्णांची मुलगी हिच्याशी विवाहबद्ध झालो होतो. लग्नानंतर तिचे नाव मी प्रीति उर्फ पार्वती असे ठेवले होते. आज आम्ही दोघे आमच्या विवाहाच्या शपथांची उजळणी करणार आहोत. तेव्हा आपणा सर्वांनी एका आवाजात आम्हाला शुभाशीर्वाद द्यावेत.

सर्वजण मोठ्याने म्हणा —— तथास्तु ——

आतां ह्यानंतरचा कार्यक्रम असतो मंगलाष्टकाचा व त्यानंतर कन्यादान. मंगलाष्टकाचा कार्यक्रम आपणा सर्वांना चांगलाच माहीत आहे. ह्यात अगदी लहानांपासून सर्वजण ह्यात भाग घेतात. त्यामुळे मी ह्यात वेळ घालवत नाही. सहसा येथे मंगलाष्टकाचा कार्यक्रम क्रम सोडून सर्वांच्या सोयीप्रमाणे एक वेळ ठरवून सर्वानी ह्या वेळीच जमावे म्हणून सांगून केला जातो. नवरा नवरी अंतरपाठाआड हार घेऊन उभे रहातात. मंगलाष्टके म्हटली जातात. मंगलाष्टके संपल्यावर अंतरपाठ बाजूला होतो. नवरानवरी एकमेकाला हार घालतात. **Wedding rings are exchanged,** मंगळसूत्र बांधले जाते वगैरे वगैरे.

कन्यादानाच्या कार्यक्रमात भटजी एक ताम्हण हातात धरून उभे रहातात. ताम्हणावर नवरदेव आपले हात ओंजळ करून धरतात. त्याच्या ओंजळीवर नवरी आपले हात ओंजळ करून धरते. तिच्या ओंजळीवर तिचे वडिल दोन्ही हात ओंजळ करून धरतात. मुलीची आई मुलीच्या वडलांच्या हातात एका पळीने थोडे थोडे असे पाणी ओतते. ते पाणी मुलीच्या हातातून मुलाच्या हातात व शेवटी भटजीने धरलेल्या ताम्हणात पडते असा प्रसंग असतो. त्यावेळी भटजी कोणाची मुलगी कोणाला दिली जात आहे ह्याचे वर्णन करतात. शेवटी निरनिराळ्या गंहिवरलेल्या स्वरात मुलीचे वडिल मुलाला तीनदा " कन्यां प्रतिगृह्णातु भवान् माझ्या मुलीचा स्वीकार करावा"

असे विनवतात. मुलगा देखील निरनिराळ्याप्रकारे मुलीच्या वडलांना तीनदा आश्वासन देतो. प्रतिगृह्णामि। प्रतिगृह्णामि। प्रतिगृह्णामि।

ह्या नंतर पाणिग्रहण. म्हणजे झाल्या प्रकाराबाबत नवरा नवरीला काय सांगतो आणि कशी शपथ देतो हा प्रसंग. तो मी पिनाकपाणि, आणि प्रीति म्हणजे पार्वती तुमच्यापुढे आतां सादर करीत आहोत.

( प्रीती माझ्यासमोर येऊन उभी राहते. मी तिच्या नजरेला नजर देऊन तिला विचारतो)

क इदम् ?

प्रीती विचारते

कस्मै अदात् ?

कामः कामाय अदात्।

कामः दाता (I blow a kiss.Priti catches it)

कामः प्रतिगृहीता (Priti blows a kiss. I catch it)

कामम् समुद्रमाविश।

कामेन त्वां प्रतिगृह्णामि

काम एतत् ते वृष्टिः असि।

द्यौः त्वां ददातु पृथिवी प्रतिगृह्णातु।

( मी तिच्या उजव्या खांद्यावर उजवा हात ठेवून म्हणतो.)

धर्मे च कामे च अर्थे च न अतिचरामि अहम्।

या नंतर प्रीती आपला उजवा हात माझ्या उजव्या खांद्यावर ठेवून म्हणते.)

धर्मे च कामे च अर्थे च न अतिचरितव्या अहम्।

Dear Paru, it feels so good to renew our wedding vows. Let us say the same thing in English as well,

I say:

On the eighth of May 1966,
Your father asked me thrice
to take you as my wife,
Love was the only price
I paid to bring you in my life.

Priti says:

Yes Pinoba,
On the eighth of May 1966,
My father asked you thrice
to take me as your wife,
Love was the only price
You paid to bring me in your life.

I say:

Like the meeting of Horizon and the sky
it was the mutual decision of you and I
We entered in this ocean of love

Priti says:

Like the meeting of Horizon and the sky
it was the mutual decision of you and I
We entered in this ocean of love

Placing my right hand on the right shoulder of Priti I say:

therefore I take this solemn vow
With respect to the righteousness
material resources and my natural desires
I shall remain within the ethical, moral
and spiritual bounderies of married life
and I shall always be faithful to you.

Priti places her right hand on my right shoulder and says:

therefore I take this solemn vow
With respect to the righteousness
material resources and my natural desires
I shall remain within the ethical, moral
and spiritual bounderies of married life
and I shall always be faithful to you.

( प्रीती म्हणते)

अरं पिनोबा! ही पुणेरी मंडळी लई शाणी हैत. पन त्यांचं संस्कृत कच्चं हाय. साळत संस्कृत आप्शन का फिप्शन हाय आसं काय तरी म्हणत्यात. त्यास्नी इंग्रजीबी कळत न्हाय। वर काय म्हणत्यात. अमेरिकेत तर्खडकरच भाषान्तर घेऊन जायला पायजे. आनी अमेरिकेला इंग्रजी शिकवायला पायजे. आरं मराटी तर सांगूच नको. अर्थाचा भलताच अर्थ करत्यात. आपुन आपलं गांवठी भाषेतच सांगून बघुया.

( मी म्हणतो)

खरंच पारू त्येच खरं हाय. तसंच करूया.

( प्रीती म्हणते) मग म्हनतर.

( मी म्हणतो)

अगं पारू. तुला त्या आधी आनी एक सांगतो. या जगात लई वंगाळ मानसं हैत. मला म्हनत्यात. तुजं अमक्या अमक्या पोरीशी लगीन झालं असतं तर किती बरं झालं असतं न्हाय। पर मी म्हनतो. तसं काय बी न्हाय. कारन जेव्हा. . . .

तुझ्या बापानं चारदां पुसलं
माझं पदरांत घे तूं बाहुलं

प्रीती म्हणते

माझ्या बापानं चारदां पुसलं
माझं पदरांत घे तूं बाहुलं

मी म्हणतो

पदरात घ्यायचं तूं काय बाहुलं
तुझ्या माझ्या प्रेमानं सूत सारं जमलं

प्रीती म्हणते

पदरात घ्यायचं मी न्हाय बाहुलं
तुझ्या माझ्या प्रेमानं सूत सारं जमलं
मी म्हणतो
प्रेमच घेणारं
प्रेमच देणारं
तुझं माझं प्रेम हाय हेच न्हाय का खरं
प्रीती म्हणते
प्रेमच घेणारं
प्रेमच देणारं
तुझं माझं प्रेम हाय हेच हाय रं खरं
मी म्हणतो
आकाशाचं टोक जसं धरणीला मिळतं
मी आकाश तूं गंगा हे साऱ्याना कळतं
प्रीती म्हणते
आकाशाचं टोक जसं धरणीला मिळतं
तू आकाश मी गंगा हे साऱ्याना कळतं
मी प्रीतीच्या उजव्या खांद्यावर उजवा हात ठेवून म्हणतो.
देवाची आण हाय शपथेवारी सांगतो
तुझ्या वाचुन कोण न्हाय संसारी पाहतो.
प्रीती पण आपला उजवा हात माझ्या उजव्या खांद्यावर ठेवून म्हणते.
देवाची आण हाय शपथेवारी सांगत्ये
तुझ्या वाचुन कोण न्हाय संसारी पाहत्ये.

ह्या नंतर होतो विवाह होम आणि लाजाहोम. हा खरा म्हणजे विवाहातला सर्वात महत्त्वाचा कार्यक्रम. या वेळी आर्यमन्, वरुण, पूषन् आणि प्रजापती या अग्निदेवांची पूजा व त्यांच्या साक्षीने विवाहातील प्रमुख शपथा घेतल्या जातात. प्रत्येक अग्निदेवासाठी एक अश्या चार फेऱ्या होमकुंडाभोवती घालून नवरा आणि नवरी अग्नीला लाह्या अर्पण करतात. पहिल्या दोन फेऱ्यात नवरा पुढे आणि नवरी त्याच्या मागून प्रदक्षिणा घालते. दुसऱ्या दोन फेऱ्यात नवरीमागे नवरा प्रदक्षिणा घालतो. यामध्ये स्त्री आणि पुरुष हे समान आहेत असे दाखवून द्यायचे असते. स्त्री आणि पुरुषामध्ये भेद भाव नसणे अवश्यक आहे. पुरुषप्रधान संस्थेतील वृद्ध मंडळीना हे कदाचित पटणार नाही. पण काळ बदलत चालला आहे. आणि काळाप्रमाणे प्रथा पण बदलत चालल्या आहेत. याचे मी आणि प्रीती थोडक्यात प्रात्यक्षिक करून दाखवणार आहोत.
( समोर ठेवलेल्या स्टुलावरील टेबललॅम्पला मी आणि प्रीती नमस्कार करून म्हणतो)

ॐ अर्यमणम् नु देवम्।
कन्या अग्निम् अयक्षत।
स इमाम् देवो अर्यमा।
प्र इतः मुञ्चातु न अमृतः। स्वाहा।
अर्यम्णे अग्नये। इदम् न मम।

( मी पुढे व प्रीती माझा हात धरून मागे असे स्टुलाभोवती फेरी घालताना मी म्हणतो)

अमोहमस्मि सा त्वमसि अमोहम्।
द्यौऽहम् पृथिवी त्वम्॥
ऋक् त्वम् सामोऽहम्। पुरुषोऽहम् प्रकृती त्वम्॥
तौ इह विवहावहै। प्रजाम् प्रजनयावहै॥
सम्प्रियो रोचिष्णु सुमनस्यमानौ।
जीवेव शरदः शतम्॥

इममाश्मानमारोह। अश्मा इव स्थिरा भव॥
सहस्व पृतनायतः। अभितिष्ठ पृतन्यतः॥१॥

I say:
You are not self-centered, Neither am I.
You are like planet earth Revolving in my sky.
Priti says:
You are not self-centered, Neither am I.
I am like planet earth Revolving in your sky.
I say:
I am a poem, You are the poetry.
I am the soul, Within your body.
Priti says:
You are a poem, I am the poetry.
You are the soul, Within my body.
I say:
Let's join hands 'cause you are my only wife
For ever lasting loving, And happy family life.
Priti says:
Let's join hands 'cause I'm your only wife
For ever lasting loving, And happy family life.
Both of us say:
Stand besides me, Solid like a rock,
And present to the world An exemplary wedlock.

आम्ही दोघे म्हणतो
तू निःस्वार्थी, मी निःस्वार्थी आपण दोघे या संसारी
मी म्हणतो
तू पृथ्वी गे मम अवकाशी, अखंड राहो तुझीच फेरी
प्रीती म्हणते
मी पृथ्वी रे तव अवकाशी, अखंड घालिन सदैव फेरी

मी म्हणतो
मी कविता अन् तुझ्याच ओळी, तू वृन्दावन मी तेथे माळी
प्रीती म्हणते
तू कविता मी त्यातिल ओळी, मी वृन्दावन तू तेथे माळी
मी म्हणतो
तुझिया शरिरी मीच चेतना, सदैव राहो हीच भावना
प्रीती म्हणते
माझ्या शरिरी तुझी चेतना, सदैव राहो हीच भावना
मी म्हणतो
विश्वंबर हे, तू त्याची माता, अग्नी साक्षी तू मी फिरता
प्रीती म्हणते
विश्वंबर हे, मी त्याची माता, अग्नी साक्षी तू मी फिरता

खरे म्हणजे पुरोहितांनी या वेळी नवरानवरीला तुम्ही अग्नीला साक्ष ठेवून शपथा घेतलेल्या आहेत. तेव्हा मी तुम्ही नवरा व बायको आहात असे जाहीर करतो असे सांगून त्याना आता तुम्ही दोघे वैवाहिक जीवनातील पहिली सात पावले टाकणार आहात असे सांगितले पाहिजे. आणि या वेळी होते त्यांची सप्तपदी.
प्रीती म्हणते
पिनोबा. एक इचारू का?
मी म्हणतो, इचार की. भ्या कोनाची हाय?
प्रीती म्हणते
हे भटजी सात फेऱ्या करायला लावत्यात. ते कशापायी? तीन वा चार का न्हायत?
मी म्हणतो, बराबर इचारलसं. ही पोरं लगीन करायला निघाल्यात. तेनला माहीत असलंच. त्यासनीच इचारून पाहूया.
काय रं मुलानो? तुमास्नी ठावं हाय?
आरं. आठवड्यातली दीस किती? सात न्हवं का?
साती दीस बायली संगतीनं फिरायला पायजे. न्हव का?
प्रीती म्हणते
आन् इन्द्र धनुषात रंग किती असत्यात? त्यात बी सातच न्हव का?
मी म्हणतो, या भुईवर किती समुंदर हैती? ते बी सातच.
प्रीती म्हणते
तुमास्नी शिनेमातली गाणी आवडत्यात. त्यात बी सातच सूर असत्यात.
मी म्हणतो, आरं अवकाशात सात ऋषी बसल्यात. ते बी सातच हैत. म्हनून सातचा आकडा लई चोख हाय.
( प्रीती आणि मी एकमेकांचा हात धरून सात पावले चालतो. प्रत्येक पावलाक्षणी आम्ही म्हणतो.)
ईषे एकपदी भव। सा माम् अनुव्रता भव।
ईश म्हणजे विश्वास. माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे. मी कधीहि तुझ्याबद्दल संशय घेणार नाही असे तुला वचन देतो।
प्रीती म्हणते
माझा पण तुझ्यावर नेहमी विश्वास आहे. कधीही तुझ्यावर संशय घेणार नाही असे मी वचन देते.
ऊर्जे द्विपदी भव। सा माम् अनुव्रता भव।
ऊर्जा म्हणजे शक्ति. बळ. मी तुझ्या आजारपणात तसेच सुद्दढ असताना तुला सदैव साथ देईन असे वचन देतो.
प्रीती म्हणते
मी पण तुझ्या आजारपणात तसेच सुद्दढ असताना तुला सदैव साथ देईन असे वचन देते.
रायस्पोषाय त्रिपदी भव। सा माम् अनुव्रता भव।
रायस् म्हणजे धन. संपत्ती. पोष म्हणजे वृद्धी. आमचे धन दौलत वाढवण्यासाठी मी तुला सारखाच हातभार लावेन. हे माझे, हे तुझे असा भेदभाव मी कधीहि करणार नाही. आमच्या भरभराटीसाठी मी नेहमी तुला साथ देईन असे मी तुला वचन देतो. आमच्यावर या समाजाचे पण ऋण आहे. याची जाणीव ठेवून ते पदोपदी फेडण्याचे मी वचन देतो.
आमचे धन दौलत वाढवण्यासाठी मी तुला सारखाच हातभार लावेन. हे माझे, हे तुझे असा भेदभाव मी कधीहि करणार नाही. आमच्या भरभराटीसाठी मी नेहमी तुला साथ देईन असे मी तुला वचन देते. आमच्यावर या समाजाचे पण ऋण आहे. याची जाणीव ठेवून ते पदोपदी फेडण्याचे मी वचन देते.
मायोभव्याय चतुःष्पदी भव। सा माम् अनुव्रता भव।
माया म्हणजे अर्थातच प्रेम. भव्य म्हणजे उत्कट. तुझ्याशिवाय ह्यापुढे इतर स्त्रीपुरुषाना मी आई वडिल भाऊ बहिण ह्याच नात्याने पाहेन. मी तुला एकपत्नीव्रताचे वचन देतो.
तुझ्याशिवाय ह्यापुढे इतर स्त्रीपुरुषाना मी आई वडिल भाऊ बहिण ह्याच नात्याने पाहेन. मी तुला एकपतीव्रताचे वचन देते.
प्रजाभ्यः पञ्चपदी भव। सा माम् अनुव्रता भव। पुत्रानं वृन्दावहे बहून्। ते सन्तु जरदष्टया।
प्रजा म्हणजे या ठिकाणी आपला समाज असे धरून ह्या समाजाची उन्नती होण्यासाठी आणि आपला समाज चिरंजीवी होण्यासाठी मी नेहमी कार्य करेन असे मी वचन देतो.
प्रजा म्हणजे या ठिकाणी आपला समाज असे धरून ह्या समाजाची उन्नती होण्यासाठी आणि आपला समाज चिरंजीवी होण्यासाठी मी नेहमी कार्य करेन असे मी वचन देते.
ऋतुभ्यः षट्पदी भव। सा माम् अनुव्रता भव.
सर्व ऋतूंचा आनंद लुटताना मी तुला कधीहि विसरणार नाही व तो तुझ्याबरोबरच अनुभवेन असे मी तुला वचन देतो. याबाबत माझा स्वार्थ असणार नाही असे मी तुला

वचन देतो.

सर्व ऋतूंचा आनंद लुटताना मी तुला कधीहि विसरणार नाही व तो तुझ्याबरोबरच अनुभवेन असे मी तुला वचन देते. याबाबत माझा स्वार्थ असणार नाही असे मी तुला वचन देते.

सखा सप्तपदी भव। सा माम् अनुव्रता भव।

मी तुझ्या जन्माचा सोबती राहेन असे तुला मी वचन देतो.

मी तुझ्या जन्माची सोबती राहेन असे तुला मी वचन देते.

यानंतर कर्मसमाप्तीचा विधि होतो. त्यावेळी विवाहाचे स्वरूप हे अवकाशातील सप्तर्षींमधल्या एकाच जागेवर सदोदित स्थिर असलेल्या अरुंधतीसारखे असावे लागते असे सांगितले जाते. मी तर म्हणतो की विवाहाचे स्वरूप हे पणतीमध्ये मंद प्रकाश देत तेवणाऱ्या ज्योतीसारखे नाजुक असते त्यासाठी तेल व वात ह्यांचा समतोल संगम असावा लागतो. तेल ओघळले अगर वात प्रमाणापेक्षा अधिक मोठी झाली तर भडका उडण्याची शक्यता असते. विवाहातसुद्धा तसाच समतोलपणा असावा लागतो.

यानंतर परमेश्वराची प्रार्थना करून त्याला या कार्यक्रमात कांही चूक झाली असेल तर क्षमा करावी व उदारहस्ते त्यातल्या चुका गोड मानून घ्याव्यात अशी मागणी केली जाते. व शेवटी मुलीला आणि जांवयाला आशीर्वाद देताना मुलीचे वडिल डोळ्यात किंचितसे पाणी आणून म्हणतात.

अर्थो हि कन्या परकीय एव।
तामद्य सम्प्रेष्य परिग्रहीतुः॥
जातो ममायम् विशदः प्रकामम्।
प्रत्यर्पितन्यास इवान्तरात्मा॥ ४.२२ शाकुन्तल॥

आजवर लहानपणापासून प्रेमाने वाढवलेली मुलगी आतां माझी नव्हती ह्याच्या दुःखाबरोबरच आजवर बाळगलेले हे ऋण ज्याचे त्याला परत करताना ऋणमुक्त होत असल्याचा मी एक आनंद उपभोगत आहे.

आपल्या मुलीच्या लग्नाच्या शेवटी भाषण करताना अमेरिकेतील माझे एक मित्र कैलासवासी भालचंद्र कवठेकर म्हणाले होते,

माझी मुलगी मला सोडून जाणार या दुःखाबरोबरच मला एक नवा मुलगा प्राप्त झाला याचा मला आनंद होतो आहे. भाल कवठेकर हे माझ्या ललितवहिनींच्या आते बहिणीचे सुपुत्र.

शेवटी, सौरभ, सत्यवती, रश्मी, योगेश, अपर्णा, मंदार, रश्मी, दीपक, पूजा, संजोग ह्या सर्वांचे अभिनंदन करून सर्वांनी एकमेकांवर खूप प्रेम करावे, त्यासाठी आणि आपल्या वैवाहिक जीवनात खूप कष्ट करून आपली भरभराट होऊ द्यावी तसेच अतीशय आगळा आनंद उपभोगावा अशी मी परमेश्वराकडे प्रार्थना करतो